# उद्याची बात

**ना. सी. फडके**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**उद्याची बात : ना. सी. फडके**

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
२२ ऑक्टोबर, २०१३

**किंमत**
₹ १८०/-

# उद्याची बात

# १

"काय चारुताई? अगदी गप्प का बसलात? मॅच पाहून दमलात की काय? काही बोला ना!" गर्दीतून वाट काढून मोटार चालविता चालविता अशोकनं म्हटलं.

उपाहाराची सुट्टी झाल्यामुळे प्रेक्षकांच्या झुंडीच्या झुंडी बाहेर पडल्या होत्या आणि रस्त्यातून गर्दीचा पूर वाहत होता. माणसांचा कलकलाट आणि मोटारगाड्यांच्या हॉर्नचे आवाज वातावरणात भरले होते. माणसं एकमेकांना ढकलीत होती, खेचीत होती, आरोळ्या ठोकीत होती, धावांचा ताजा आकडा विचारीत होती व सांगत होती. चिकी, वेफर, पानपट्टी, स्कोअरकार्ड विकणारे कोकलत होते. फूटपाथवर लागलेल्या एका ऊसाच्या रसाच्या दुकानात लाकडी चरक फिरविणारे दोघे तगडे जवान उंच आवाजात गाण्याची लकेर मारीत होती, 'हिरव्या ऊसावर गुलाबी तुरा, तुरा र तुराऽऽ!' मोटार हाकणारे हॉर्नचे आवाज करीत होती. माणसं दूर सरकत नव्हती, तुंबलेलं पाणी हळूहळू वहावं त्याप्रमाणे अगदी मंदगतीनं एक एक कदम पुढे सरकणाऱ्या गाड्या आपल्या मिशांनी वाट चाचपीत सरपटणाऱ्या किड्यांप्रमाणे भासत होत्या...

मोटारीत मागच्या सीटवर बसलेल्या चारुलतेनं काय उत्तर दिले ते अशोकला चहूबाजूंच्या कलकलाटामुळे ऐकू आले नाही. त्याचा समज झाला की आपण काय म्हटलं ते चारुलतेनं ऐकलं नसावं. या गर्दीत आणि कटकटीत बोलण्याचा प्रयत्न करण्यात काही अर्थ नाही असं मनाशी ठरवून तो गाडी गर्दीतून चालवू लागला. कुणी

तरी त्याला उंच आवाजात म्हटलं, ''हॅलो! अशोक!'' तो मान वळविणार होता, परंतु तितक्यात दोन म्हाताऱ्या बाया एकमेकीला ओढीत ढकलीत बरोबर त्याच्या गाडीसमोर आल्या आणि हॉर्न वाजविण्याकडे व गाडी एकदम उभी करण्याकडे त्याला सगळं लक्ष द्यावं लागलं. त्या दोन बाया दूर झाल्या आणि दुसऱ्या एका गाडीवर धडकल्या. गाडीला पुन्हा गती देताना अशोक हसून म्हणाला, ''बघितलंत चारुताई, म्हाताऱ्या बायकासुद्धा मॅच बघायला येऊ लागल्या. क्रिकेटची आवड किती फैलावली आहे पहा.''

चारुलता काय म्हणाली ते त्याला ऐकू आलं नाही. त्यानं पुन्हा मनाशी ठरविलं की आपलं बोलणं तिला ऐकू गेलं नसावं.

गर्दी मागं टाकून प्रशस्त मोकळ्या रस्त्याला लागल्यावर अशोकनं विचारलं, ''कोणत्या हॉटेलात जायचं? जिथे गर्दी नसेल अशा एखाद्या दूरच्या ठिकाणी गेलेलं बरं. पाऊण तासात परत जायला हवं. मॅचला खरा रंग आताच येणार आहे. संजीव गेल्या अर्ध्या तासात जपून खेळला, पण आता लंचनंतर फारसा वेळ न घालविता तो फटकेबाजी सुरू करील. आता मॅचला जास्त गर्दी होईल बघा. कोणत्या हॉटेलात जायचं आपण?''

चारुलतेनं काहीच उत्तर दिलं नाही म्हणून मान मुरडून त्यानं मागं पाहिलं तो सीटच्या पाठीवर तिनं मान टाकून दोन्ही हातांनी डोळे झाकलेले त्याला दिसले. गाडीचा वेग अगदी कमी करून त्यानं हाक मारली, ''चारुताई!'' तिनं तोंडावरचे हात दूर केले, मान उचलली आणि पुढे झुकून त्याच्याकडे बघितलं. तिचे डोळे ओले झाले होते! त्याच्या मनात आलं, हे काय, म्हणजे ही इतका वेळ स्वत:शीच रडत होती की काय? का? काय झालं होतं? पण तो हसला आणि म्हणाला, ''कोणत्या हॉटेलात जायचं आपण?''

चारुलतेनं उसासा टाकला आणि म्हटलं, ''मला घरीच नेऊन सोडलंत तर बरं होईल.''

त्यानं हसत विचारलं, ''म्हणजे काय? आता तर मॅचला खरा रंग चढणार आहे. संजीवचा खेळ पहायसाठी–''

चारुलता म्हणाली, ''तुम्ही जाऊन बघा त्याचा खेळ आणि संध्याकाळी मला सांगा. माझं डोकं फार दुखायला लागलंय. घरी जाऊन स्वस्थ पडणार आहे मी–''



''पण लंच घेतल्यावर तुम्हाला बरं वाटेल–''

''नाही, मला नाही बरं वाटायचं. तुम्ही फार आग्रह केला म्हणून मी मॅचला आले. परंतु मी यायला नको होतं.'' बोलता बोलता तिनं एक मोठा सुस्कारा सोडला.

हे पाहून अशोकला फार वाईट वाटलं. काय बोलावं ते त्याला सुचेना.

त्यानं फार आग्रह केला म्हणून ती त्याच्याबरेबर मॅच बघावयास आली होती, हे खरं होतं. प्रथम तिची बिलकुल इच्छा नव्हती. ती म्हणाली होती, ''कुठे जावं, काही पाहावं, मजेत वेळ घालवावा असं मला वाटतच नाही.'' हे बोलताना तिची चर्या इतकी उद्विग्न आणि दीनवाणी झालेली त्याला दिसली होती की त्याचं अंत:करण भडभडून आलं होतं. तो मनाशी म्हणाला होता, हिचं म्हणणं काही खोटं नाही. तिचा प्रेमाचा संसार अकस्मात उद्ध्वस्त झाला. संजीवपासून ही वेगळी राहू लागल्याला पुरते तीन महिनेसुद्धा झालेले नाहीत. दोन वर्षांचा छोटा विलास हाच काय तो तिच्या मनाचा तोल सावरणारा प्रेमाचा तंतू! तीनं आपल्या दु:खात चूर असावं हेच साहजिक होतं. त्याला क्षणभर वाटलं हिला आग्रह करू नये. परंतु तो म्हणाला, ''चारुताई, चार चौघांत मिसळलं, गर्दीत वावरलं की माणसाच्या मनाला घटकाभर का होईना बरं वाटतं. अगदीच एकलकोंडं राहून, दारं बंद करून घरातल्या घरात दिवस काढता तुम्ही. अशानं तुमचं दु:ख ओसरायचं नाही. माझं ऐका. तुम्हाला बरं वाटेल. मॅचला जाऊया.''

तिनं मान हलविली आणि म्हटलं, ''नको.''

तो म्हणाला, ''उद्याच्या मॅचमध्ये संजीव खेळणार आहे. लोकांची गर्दी होणार आहे ती त्याचा खेळ पाहायसाठी. तुम्हाला नाही का पाहावासा वाटत त्याचा खेळ?''

तिनं हास्य केलं ते उदासवाणं होतं. ती म्हणाली, ''पुष्कळ पाह्यलाय मी त्याचा खेळ. तुम्हाला माहीत का नाही, त्याच्या प्रत्येक मॅचला मी धावत जात असे. तो कितीदा तरी म्हणे, आजची मॅच साधीच आहे, कशाला येतेस. पण मी गेल्याशिवाय राहत नसे. विलास झाला तेव्हाची गंमत तुम्हाला ठाऊक आहे ना? मॅच बघत असतानाच माझं पोट दुखायला लागलं. संजीव खेळत होता. त्याला निरोप ठेवला आणि एकटीच हॉस्पिटलकडे गेले. संजीव मॅच आटोपल्यावर आला तोपर्यंत विलास जन्मलासुद्धा होता. संजीवनं मला प्रेमानं घट्ट धरलं आणि तो माझ्या कानात हळूच म्हणाला, ''पहिल्याच कसोटी सामन्यात शतक झळकविणाऱ्या खेळाडूसारखा

पराक्रम केलास तू, चारू! पहिल्याच खेपेस मुलगा झाला! मी त्याला हळूच म्हटलं, ''मला एकटीलाच झाला काय, तुलासुद्धा नाही का झाला?'' माझ्या गालावर तोंड टेकून तो म्हणाला, ''आपण दोघं मोठी नशीबवान आहोत, नाही?''... बोलता बोलता ती एकदम स्तब्ध झाली आणि तिनं सुस्कारा टाकला. जरा वेळानं ती पुटपुटली, ''आता त्याचा खेळ बघायला धाव घ्यावीशी वाटत नाही. संसाराचा हा विचित्र खेळ त्यानं केलान्! माझ्या मनाची सारी उमेदचं खचून गेली. कशाला जायच उद्याची मॅच पाहायला? नको?–''

पण तरीदेखील अशोकनं तिला आणखी आग्रह केला होता. संजीवची आणि तिची मॅचच्या ठिकाणी समोरासमोर भेट होण्याची शक्यता दिसली असती तर त्यानं तिला आग्रह केला नसता. परंतु तशी शक्यता नव्हती. तो दूर मैदानात खेळणार होता. ती आपल्या जागी खुर्चीत बसून खेळ पाहणार होती. तिला क्रिकेटची फार आवड होती. हिंदुस्थानच्या दौऱ्यावर आलेल्या पाहुण्या संघाबरोबरचा कसोटी सामना प्रेक्षणीय होणार होता. आणि मुख्य म्हणजे अशोकला प्रामाणिकपणानं वाटत होतं की चारुलतेनं सदा अंथरुणावरच्या उशीत डोकं खुपसून दु:ख उगाळीत बसू नये. तशानं दु:ख कमी होण्याऐवजी वाढेल मात्र. तिचं दु:ख अगदी वाजवी होतं. तिनं संजीववर फार प्रेम केलं होतं. त्यानंही आपला मूळचा नाचरा, रंगेल, बेजबाबदार स्वभाव टाकून तिच्यावर प्रेम केलं होतं, तिला सुखात ठेवलं होतं. चारुलतेचे परोपरीचे लाड करताना संजीवला पाहून अशोकला वाटलं होतं. हा आता कायमचा निवळला. चारुलतेच्या सहवासानं आणि प्रेमानं हा सुधारला. संजीव मूळचा किती रंगेल आणि उच्छृंखल होता ते अशोकइतकं दुसऱ्या कुणालाच माहीत नव्हतं. त्याचा आणि संजीवचा कित्येक वर्षांचा स्नेह होता; आणि संजीवच्या दोषांबद्दल आणि चुकांबद्दल त्याचा कान धरून त्याला शहाणपण शिकविणारा संजीवचा कदाचित एकच मित्र तो होता. चारुलतेचा सुखाचा संसार पाहून त्याच्याइतका आनंद दुसऱ्या कुणालाच झाला नसेल. आणि संजीवचा स्वभावधर्म पुन्हा उचल खाऊ लागला. तो पुन्हा बेजबाबदारपणानं वागू लागला. चारुलतेला प्रथम फसवू लागला आणि नंतर तिचं सुखदु:ख हिशेबात न धरता वागू लागला, चारुलतेच्या संसाराला तडे जाऊ लागले, तेव्हा त्याच्याइतका खेदही दुसऱ्या कुणाला झाला नसेल. संजीवनं शुद्धीवर यावं म्हणूनत्याच्याइतकी धडपड कुणी केली नसेल. संजीवला शहाणपणा शिकविणं



अशक्य आहे. असं ठरल्यावर चारुलतेचा कैवारही त्याच्याइतका कुणी घेतला नसेल; घटस्फोटाचा खटला कोर्टात जाण्याची पाळी येऊ न देता संजीवकडून चारुलतेला दरमहा पोटगी मिळावी म्हणून अशोकनंच अवश्य ती सारी खटपट केली होती, आणि ती यशस्वी झाल्यावर त्याला फार समाधान झालं होतं...

चारुलतेच्या दु:खाची अशोकला पूर्ण कल्पना होती. तिचं दु:ख अगदी वाजवी होतं. परंतु दु:खात बुडून जाऊन तिनं असे किती दिवस काढायचे असं त्याला वाटत होतं. चारुलतेविषयी त्याला फार सहानुभूती वाटत होती. तिच्या सुखावर झालेल्या आघातानं तिची जी दुर्दशा झाली होती ती पाहून त्याला तिची फार दया येई. परंतु नाना तऱ्हांची दु:खं भोगणाऱ्या कितीतरी स्त्रिया त्याला दिसत होत्या. कुणाला वांझपणाचं दु:ख होतं, कुणाला फार मुलं झाल्यामुळे शारीरिक आणि मानसिक व्यथा सोसावी लागत होती, कुणाचा नवरा व्यसनी होता, कुणाचा पौरुषहीन होता, कुणाला सासूचा छळ होता, कुणाची मुलं वाह्यात निघाली होती, आणि तरी यांपैकी कित्येक स्त्रिया धीरानं आणि निश्चयानं जगत होत्या. माणसानं असंच जगायला शिकलं पाहिजे. संसारात सुख थोडं आढळतं, दु:ख फार आहे. सुख क्वचित वाट्याला येतं, दु:ख पदोपदी भेटतं. जीवनाच्या प्रवाहात संकटाचे आणि दु:खांचे भोवरे फार आहेत. त्यात सापडलेल्या माणसानं डोकं वर ठेवलं पाहिजे, हात मारीत तरंगत राहिलं पाहिजे. गटांगळी खाऊन बुडून कसं चालेल?... म्हणून अशोकला मनापासून वाटत होतं की चारुलतेनं स्वत:च्या दु:खात असं चूर होऊन दिवस काढणं बंद करायला हवं. ही गोष्ट ती आपण होऊन करणार नाही. आपण तिला ही गोष्ट करायला भाग पाडलं पाहिजे हे त्यानं ओळखलं होतं. एवढ्याचसाठी तिला न विचारता तिच्यासाठी मॅचचं तिकीट त्यानं काढून आणलं होतं. ती चटकन् कबूल होणार नाही याची कल्पना होती; परंतु तिला घेऊन जाण्याचा निश्चय त्यानं केलेला होता.

त्यानं तिच्याकडे काहीसं रोखून बघत विचारलं, ''उद्याच्या मॅचमध्ये संजीव खेळणार नसता तर तुम्ही मॅच बघायला आला असता?''

तिनं त्याची नजर टाळली नाही. ती म्हणाली, ''म्हणजे तुमची कल्पना अशी की काय की संजीवचं मला भय वाटतं?''

''भय हा शब्द चुकीचा म्हणा, परंतु मला शंका मात्र येते की उद्याच्या मॅचमध्ये संजीव खेळणार आहे म्हणूनच मॅच बघणं नको असं तुम्हाला वाटतं–''

''तुमची शंका अगदीच चुकीची आहे असं मला म्हणता यायचं नाही. पण– माझ्या मनाला नक्की काय वाटतं ते मला नीट सांगता येणार नाही. ते फार गुंतागुंतीचं आहे. माझं मलाच धड कळत नाही. परंतु नको ते मॅचला जाणं असं मला वाटतं एवढं खरं.''

''चारुताई, ज्यानं तुम्हाला फार दु:ख दिलं त्या संजीवचं दर्शनसुद्धा पुन्हा नको असं तुम्हाला वाटत असेल तर ते अगदी साहजिकच आहे. त्याबद्दल मी तरी तुम्हाला दोष देणार नाही. मात्र जे तुम्हाला वाटतं त्याला भय हाच शब्द लावावा लागेल. आणि म्हणून माझा तुम्हाला आग्रह आहे की तुम्ही मॅचला चलाच. कोणत्याही गोष्टीचं भय मनात तसं राहू देणं फार वाईट. तसं केल्यानं त्या भयाचीच एक भीती उत्पन्न होते. ज्या गोष्टीचं भय वाटतं तिला एकदा सरळ तोंड द्यावं आणि तिचा निकाल लावावा हे चांगलं. तुम्ही म्हणाल, काढलंत का तुमचं नवमानसशास्त्र–'' बोलता बोलता तो किंचित हसला.

तो हसल्यामुळे तिलाही हसू आलं.

त्याचा फायदा घेऊन अशोक म्हणाला, ''माझं ऐका. मॅचला चला. काय होतं बघू तरी.''

''व्हायचंय काय?'' ती आणखीच हसली.

आज सकाळी दहा वाजता तो तिच्याकडे गाडी घेऊन आला तेव्हा ती कपडे करून तयार होती. त्यानं विचारलं, ''चलायचं?'' ''एक मिनिट'' असं म्हणून ती तोंडाला पावडर लिप्स्टिक लावायसाठी आतल्या खोलीत गेली. तिचा आनंदी हसरा चेहरा बघून अशोकला फार बरं वाटलं. किती दिवसांनी तरी तिनं चांगले कपडे केले होते! किती दिवसांनी तरी तिच्या चर्येवर उल्हास दिसत होता!

जेवणाच्या खोलीत राधा मोलकरीण छोट्या विलासला जेवू घालीत होती. अशोक जेवणघराच्या दारात गेला आणि म्हणाला, ''काय साहेब, छोटी हजेरी चालली आहे वाटतं?'' जवळ जाऊन त्यानं विलासला कुरवाळलं. आणि त्याच्या तोंडाचं खरकटं लागू नये अशा बेतानं त्याचा मुका घेतला. विलासनं आपल्या बोबड्या भाषेत विचारलं. ''तुम्ही आईला घेऊन कुठे जाणार आहात? मला नेणार नाही? तिथे बुवा आहे, होय? त्या बुवाला मोठाल्या मिशा आहेत? दाढी आहे?''

ते ऐकून अशोकला हसू आलं. त्यानं विचारलं, ''कुणी सांगितलं तुला?''



''मी आईला म्हटलं मी येणार. तेव्हा–''

तितक्यात चारुलता आपल्या खोलीतून तिथे आली आणि म्हणाली, ''तुला नेला असता रे राजा. पण तिथे बुवा आहे–''

तिनं डोळे मिचकावून अशोकला खूण केली. ती पाहून तो हसला आणि म्हणाला, ''होय होय. तिथे मोठ्ठा बुवा आहे खरा. लहान मुलं दिसली की म्हणतो खाऊ काय?'' हे सांगताना त्यानं केलेला अभिनय पाहून चारुलता मोठ्यांदा हसू लागली.

तिनं पुढे होऊन विलासला कुरवाळलं आणि म्हटलं, ''मी लवकर येईन हं.''

''खाऊ आणशील?''

''आणीन तर.'' राधा मोलकरणीकडे बघून तिनं म्हटलं, ''संभाळ हो.''

राधा म्हणाली, ''संभाळत्ये. काही काळजी करू नका. सावकास या.'' कित्येक दिवसांनी मालकीण थाटमाट करून घराबाहेर पडत होती याचा आनंद जणू तिला देखील झाला होता. असं राधेच्या चर्येवरून दिसलं.

चारुलता अशोकला म्हणाली, ''चला.''

गाडी चालू झाल्यावर मागच्या सीटवरून चारुलता म्हणाली,

''दाढीमिशावाल्या बुवाचा तुमचा अभिनय पाहून मला जास्त का हसू आलं माहीत आहे का?''

समोर रस्त्याकडे पाहातच अशोकनं विचारलं, ''का?''

''तो अभिनय तुम्ही केलात म्हणून!''

''म्हणजे काय? मला अभिनय येत नाही अशी तुमची कल्पना होती की काय? शाळा–कॉलेजच्या नाटकात मी चांगली कामं केली आहेत–''

''तसं नाही...''

''मग?''

''नवमानसशास्त्राचे तुम्ही चाहते. जेव्हा जेव्हा आणि ज्याला त्याला तुम्ही ते पाजीत असता. तुमच्या त्या शास्त्राप्रमाणे लहान मुलांना कधी खोटं सांगता कामा नये, भीती दाखवता कामा नये.''

''बरोबर आहे–''

''म्हणजे विलास जेव्हा मला म्हणाला, तुझ्याबरोबर मी येणार तेव्हा मी त्याला समजावून सांगायला हवं होतं, मी जो खेळ पाहायला जात आहे तो तुला समजायचा